महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १०+८ = १८, किंमत : ₹ ५.००

सातारा, शनिवार, दि. १६ फेब्रुवारी २०१९

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

भारतमातेमुळे आज प्रत्येकजण मोकळा श्वास घेत आहे, या भारतमातेच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वांचीच असून, विद्यार्थ्यांनी देशाच्या हितासाठी सैन्य दलात अथवा पोलीस दलात भरती व्हावे.

**- विश्वास नांगरे-पाटील,**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोल्हापूर परिक्षेत्र




**कोरेगाव डी. पी. भोसले कॉलेज येथे अमर ज्योती स्मृतिस्तंभास विश्वास नांगरे-पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण केले.**

## कोरेगावमध्ये विश्वास नांगरे-पाटील यांच्याकडून स्मृतिस्तंभास पुष्पचक्र

कोरेगाव : येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजमध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने काश्मीरमधील पुलवामा येथे गुरुवारी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताफ्यावर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक धीरज पाटील, पोलीस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे, पोलीस निरीक्षक दादासाहेब चुडाप्पा, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभागप्रमुख प्रा. ले. बाळकृष्ण भोसले, प्रा. बाळासाहेब चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी नांगरे-पाटील, धीरज पाटील यांनी अमर जवानांच्या स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक संतोष साळुंखे, उपनिरीक्षक अविनाश राठोड, गणेश जगदाळे, सोनेरी ग्रुपचे संस्थापक संतोष नलावडे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, छात्र व विद्यार्थी उपस्थित होते.